RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक १४(२)] शुक्रवार, फेब्रुवारी २६, २०२१/फाल्गुन ७, शके १९४२ [पृष्ठ १, किंमत :रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अधिसूचना**

क्रमांक : मिभामनपा/सचिव/१०४/२०२०-२१, दि. २६ फेब्रुवारी २०२१

मिरा भाईदर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ चे तरतुदी अन्वये, नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणेसाठी दिनांक ७ डिसेबर २०२० (दिनांक ४ डिसेंबर २०२० रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेमध्ये निर्णय होऊन खालील ४ व्यक्तींचे नामनिर्देशन , नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून करणेस महासभेने मान्यता दिलेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई दावा क्र . ९८२७९/२०२० मधील इंटरीम अर्ज क्र. ४२११/२०२१ वर दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस ४ नामनिर्देशित सदस्यांची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करणे आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने, मी, वासुदेव शिरवळकर, नगरसचिव, मिरा-भाईंदर महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ नियम ६ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करीत आहे.

| अ. क्र. | नामनिर्देशित पालिका सदस्याचे नाव | पक्ष/आघाडी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | श्री . अजित भगवान पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री . भोसले अनिल बाबुराव | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री . शर्मा भगवती तुगनचंद | भारतीय जनता पार्टी |
| ४ | ॲड. खान शफीक अहमद सादत खान | काँग्रेस लोकशाही आघाडी |

भाईंदर,
दिनांक २६ फेब्रुवारी २०२१.

**वासुदेव शिरवळकर,**
नगरसचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.